**Rayat Shikshan Sanstha's**

# KARMAVEER BHAURAO PATIL COLLEGE, VASHI

## EBSB ACTIVITY

## Lockdown Social Activity
## 'STAY HOME, STAY SAFE'

**Date: 15.05.2020**

कोरोना प्रादुर्भावा मुळे लॉकडाउन काळात कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी ,नवी मुंबई च्या एक भारत श्रेष्ठ भारत क्लबचा स्वयंसेवक सिद्धाराम रामन्ना संगपाळ हा विविध स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून चालू असलेल्या सेवा कार्यात सुरक्षेची पुरेपूर काळजी घेत सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपत आहे.या सेवा कार्यात नवी मुंबई सिटीझन्स फाऊंडेशन च्या सोबत नवी मुंबई मधील महापे श्रमिक नगर येथील गरीब पारधी वस्ती मधील जे बांधव समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहेत असे रस्त्यावर,टोल नाक्यावर विविध वस्तू,हार फुले विकून घर चालवणाऱ्या बांधवाना लॉकडाउन काळात सलग ३५ दिवस रोज सकाळी ,संध्याकाळी फूड पॅकेट्स वितरण केले. त्याचसोबत नवी मुंबई मधीलच तुर्भे येथील हनुमान नगर मध्ये राहणाऱ्या व बिगारी काम करणाऱ्या बांधकाम कामगार यांना सुद्धा जेवण वाटप करण्यात आले. फक्त एवढ्यावरच न थांबता नवसंकल्प सामाजिक संस्थे सोबत घणसोली गाव, वाशी गाव,कोपरी गाव,कोपरखैरणे येथील मध्यमवर्गीय रिक्षा चालक बांधव, घरकाम करणाऱ्या स्त्रिया अशा तब्बल ११५ गरजू कुटूंबाना एकूण १००० किलो तांदूळ व ३९० किलो तूर डाळ व ज्या घरात लहान बाळ आहे अशा कुटूंबाना दुधाचे पॅकेट देखील वाटप केले आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त संजय कुमार यांच्या सुचने नुसार स्वयंसेवक सिद्धाराम संगपाळ हा वाशी पोलीस स्टेशन अंतर्गत परिसरात जो भाग ,जी बिल्डिंग कंटेन्मेंट झोन आहे ,विलगीकरणं केली आहे अशा ठिकाणी राहणाऱ्या बांधवाना अत्यावश्यक सेवा पुरवण्याचे काम "पोलीस मित्र" या नात्याने गेली महिनाभर करत आहे. त्यासाठी वाशी पोलीस स्टेशन कडून स्वयंसेवक सिद्धाराम संगपाळ याला "पोलीस मित्र व कोव्हिड-१९ वॉरियर असे ओळखपत्र ही देण्यात आले आहे.

यासोबतच कोरोना संकटात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या रबाळे पोलीस स्टेशन ते वाशी पोलीस स्टेशन मधील चेकपॉईंट वर तैनात असणाऱ्या पोलीस बांधवाना पाणी आणि इलेक्ट्रोल पॉवडर चे सुद्धा वाटप करण्यात आले.